मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५१६ वा ● मंगळवार, ता. १० फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## सायबर गुन्हेगारी विरुद्धचे युद्ध सर्वांनी मिळून लढावे लागेल- बोरसे

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

संपूर्ण जगात सायबर गुन्हेगारीने थैमान घातले असून अशा काळात प्रत्येकाने सायबर सुरक्षेबाबत सतर्क राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन पोलीस आयुक्त भूषण बोरसे यांनी केले. येथील सीपीएड मैदानावर बेळगाव क्रेडाईतर्फे आयोजित बेल्कॉन प्रदर्शनाच्या चौथ्या दिवशी रविवारी शहर विकासावरील चर्चासत्रात ते बोलत होते. दीपप्रज्वलन करून बोरसे यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले. यावेळी महापालिकेचे आयुक्त कार्तिक, बेळगाव क्रेडाई अध्यक्ष युवराज हुलजी, इव्हेंट चेअरमन प्रशांत वाडकर, राजेंद्र मुतगेकर, डॉ. राजशेखर आदी उपस्थित होते. क्रेडाईचे माजी अध्यक्ष आनंद कुलकर्णी यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना बोरसे म्हणाले की, जगभरात सायबर गुन्हेगारीच्या टोळ्या सक्रिय असून कंबोडिया, थायलंड, म्यानमार येथील गुन्हेगारही भारतात सक्रिय झाले आहेत. मोबाईलच्या माध्यमातून आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवून फसवणूक केली जात असून गेल्या वर्षात सुमारे २७ हजार कोटींची लूट झाली आहे. डिजिटल अरेस्टची भीती, विविध अमिषे तसेच अश्लील चित्रफितींच्या जाळ्यात अडकवून महिला, युवक, वृद्ध व श्रीमंतांची फसवणूक केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांकडून जनजागृती केली जात असली तरी नागरिकांनीही खबरदारी घेणे आवश्यक आहे. बेळगाव शहरात सायबर क्राईम पोलीस ठाणे सुरू करण्यात आले असून सायबर गुन्ह्यांविरुद्धचे युद्ध सर्वांनी मिळून लढणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या सुरक्षेबाबत बोलताना शांतता व सामाजिक सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी असल्याचे सांगत महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी २४ फिरती वाहने तैनात करण्यात आली आहेत. आत्महत्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मानसिक आरोग्याबाबतही उपाययोजना सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजेंद्र मुतगेकर यांनी स्वागत केले तर अध्यक्ष युवराज हुलजी यांनी प्रास्ताविक केले.

**शहराचा विस्तार व वाहनसंख्या वाढल्याने वाहतूक व पार्किंग समस्या निर्माण झाल्या असून बायपास, रिंग रोड व मल्टीस्टोरी पार्किंगची गरज त्यांनी व्यक्त केली. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर अवजड वाहनांना शहरात प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले असून लवकरच १८ अत्याधुनिक सिग्नल्स बसवण्यात येणार.**

**भूषण बोरसे,**
पोलीस आयुक्त

## महायुतीचा दबदबा कायम; ७ जिल्ह्यांत भाजप नंबर १




**पुणे । रयत समाचार**

राज्यातील १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून ग्रामीण राजकारणात महायुतीने आघाडी घेतल्याचे चित्र समोर आले आहे. नगरपालिका व महापालिका निवडणुकांनंतर जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाने चांगली कामगिरी केली आहे. महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळवता आले नसल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. निकालानुसार भाजपने सर्वाधिक सात जिल्हा परिषदांमध्ये सत्ता मिळवली असून शिवसेना (शिंदे) गटाला तीन जिल्ह्यांत यश मिळाले आहे. पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सोलापूर जिल्हा परिषदेत भाजपने ४२ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले, तर पुणे जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी (अजित पवार) गटाने ४८ जागांसह सत्ता मिळवली. कोल्हापूर जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी (अजित पवार) २०, काँग्रेस १५ व भाजप १२ जागांवर विजयी झाले असून मिश्र राजकीय चित्र दिसून आले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेत भाजप २३ व शिवसेना (शिंदे) २० जागांसह आघाडीवर आहेत. परभणी जिल्हा परिषदेत भाजप २३ जागांसह पुढे असून राष्ट्रवादी (अजित पवार) १४ जागांवर विजयी झाली. धाराशिव जिल्हा परिषदेत भाजप १६ आणि शिवसेना (शिंदे) १५ जागांवर निवडून आले. लातूर जिल्हा परिषदेत काँग्रेसने २३ जागांसह आघाडी घेतली असून भाजप १८ जागांवर विजयी झाला. रायगड जिल्हा परिषदेत शिवसेना (शिंदे) २६ जागांसह पुढे असून रत्नागिरी जिल्हा परिषदेतही शिंदेसेनेने ४० जागा जिंकत वर्चस्व राखले. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत भाजपने २७ जागांसह सत्ता मिळवली. सातारा जिल्हा परिषदेत भाजप २३ व राष्ट्रवादी (अजित पवार) २२ जागांमुळे चुरशीचे चित्र दिसले. सांगली जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी (शरद पवार) १७, भाजप १७ व काँग्रेस ११ जागांवर विजयी झाले. या निकालांमुळे राज्यातील ग्रामीण राजकारणात महायुतीचे वर्चस्व दिसून येत असले तरी काही जिल्ह्यांत स्थानिक आघाड्या व पक्षांचे प्रभावी अस्तित्व कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## भारत-ग्रीस संरक्षण सहकार्य भक्कम

### द्विपक्षीय लष्करी सहकार्यावर ऐतिहासिक शिक्कामोर्तब




**महत्त्वाचे निर्णय आणि करार:**

**संरक्षण औद्योगिक भागीदारी:** भारताचा आत्मनिर्भर भारत उपक्रम आणि ग्रीसचा अँजेडा २०३० संरक्षण सुधारणा कार्यक्रम यांच्यात समन्वय साधून स्वदेशी संरक्षण उद्योगाची क्षमता वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला.

**लष्करी सहकार्य योजना २०२६:** दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांमधील विविध लष्करी उपक्रम आणि सरावांची रूपरेखा निश्चित करण्यात आली आहे.

**सागरी सुरक्षा:** हिंदी महासागर क्षेत्रातील माहिती संलयन केंद्रात (IFC-IOR, गुरुग्राम) ग्रीसच्या वतीने एका आंतरराष्ट्रीय संपर्क अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची घोषणा करण्यात आली.

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारत आणि ग्रीस (हेलेनिक प्रजासत्ताक) यांच्यातील धोरणात्मक भागीदारीला नवे बळ देत, दोन्ही देशांनी संरक्षण औद्योगिक सहकार्य मजबूत करण्यासाठी एका संयुक्त आशय घोषणापत्रावर स्वाक्षरी केली. तसेच, द्विपक्षीय लष्करी सहकार्य योजना २०२६ चे आदान-प्रदान करत लष्करी संबंधांचा पाच वर्षांचा रोडमॅप तयार करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. सोमवारी, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि ग्रीसचे संरक्षण मंत्री निकोलाओस-जॉर्जियोस डेंडियास यांच्यात महत्त्वपूर्ण द्विपक्षीय बैठक पार पडली. प्रादेशिक शांततेवर भर बैठकीदरम्यान दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि दोन्ही देशांमधील ऐतिहासिक मैत्रीपूर्ण संबंधांचा पुनरुच्चार केला. सागरी सुरक्षेबाबत दोन्ही देशांचे विचार समान असून, मुक्त आणि सुरक्षित सागरी क्षेत्रासाठी एकत्र काम करण्यावर भर दिला. वीर जवानांना मानवंदना द्विपक्षीय चर्चेपूर्वी ग्रीसच्या संरक्षण मंत्र्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन हुतात्मा जवानांना श्रद्धांजली वाहिली. तसेच मानेकशॉ सेंटर येथे त्यांना त्रि-सेवा गार्ड ऑफ ऑनर देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रीसच्या शिष्टमंडळाने आपल्या दौऱ्यात बेंगळुरू येथील प्रमुख संरक्षण प्रतिष्ठानांना आणि नवी दिल्लीतील स्टार्टअप्सना भेट देऊन भारतीय संरक्षण क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला.

## उद्योग-सेवेतूनच आदिवासी महिलांचे सक्षमीकरण

### सरकार ठामपणे पाठीशी- मंत्री डॉ. रमेश तवडकर




**पैंगिण । रयत समाचार**

बांदोडा फोंडा येथे 'सेवा' संस्था आणि आदिवासी कल्याण खाते, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा महोत्सव २०२६' निमित्त ''उद्योग आधार योजना'' अंतर्गत प्रदर्शन-विक्री व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश आदिवासी समाजातील महिला व युवकांना स्वावलंबी बनवणे तसेच त्यांच्या कौशल्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे वीज मंत्री सुदिन ढवळीकर उपस्थित होते, तर अतिथी म्हणून आदिवासी कल्याण खात्याचे मंत्री डॉ. रमेश तवडकर उपस्थित होते. यावेळी कवळे जिल्हा पंचायत सदस्य गणपत नाईक, प्रियोळ जिल्हा पंचायत सदस्य अदिती गावडे, सरपंच सर्वेश गावडे, विशांत गावडे, अमृता नाईक, उपसरपंच दिलेश गावकर, चित्रा फडते, सेवा संघाचे अध्यक्ष मच्छिंद्र शिरोडकर आदी मान्यवर उपस्थित होते. मार्गदर्शन करताना मंत्री डॉ. रमेश तवडकर म्हणाले, ''अशाच सेवाभावी उपक्रमातून खरे नेतृत्व पुढे येते. उपाशी पोटी सेवा होत नाही; उद्योग आधार योजनेमुळे आदिवासी समाजातील महिला आत्मविश्वासाने पुढे येत आहेत. प्रत्येकाला कष्टाचे महत्त्व माहीत आहे आणि आपले सरकार सदोदित त्यांच्या पाठीशी आहे. आदिवासी समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न सरकार करत असून शिक्षणाशिवाय गावाचा सर्वांगीण विकास अशक्य आहे.'' त्यांनी उद्योग-आधारित उपक्रमांना अधिक चालना देण्याची गरज अधोरेखित केली. या प्रसंगी नवीता नाईक यांच्या 'नवी कणसं' या मासिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शन-विक्रीत स्थानिक उत्पादने, हस्तकला व महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे स्वागत सेवा संघाचे अध्यक्ष मच्छिंद्र शिरोडकर यांनी केले. सूत्रसंचालन ममता गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कविता परवार यांनी मानले.

## गावगाडा प्रशासकांच्या हाती, ५७ ग्रामपंचायतींवर 'प्रशासक राज'

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील ५७ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे दि. ८ फेब्रुवारीपासून त्या ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांनी नियुक्तीचे आदेश काढले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर न केल्याने अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांना मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच विकासकामे रखडू नयेत यासाठी विविध विभागांतील अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. काही अधिकाऱ्यांकडे दोन ते तीन ग्रामपंचायतींची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ग्रामपंचायत व प्रशासक यांची नावे पुढीलप्रमाणे : आंबीलवाडी व पारगाव मौला संगीता साबळे (अंगणवाडी पर्यवेक्षिका), अकोळनेर व खोसपुरी एस. ए. आंबेडकर (शाखा अभियंता), बहिरवाडी व जेऊर रवींद्र कापरे (शिक्षण विस्ताराधिकारी), भोरवाडी व कामरगाव श्वेता गवळी (अंगणवाडी पर्यवेक्षिका), बुऱ्हाणनगर, हिवरे बाजार व देवगाव चंद्रकांत खाडे (ग्राम विस्तार अधिकारी), चास व हातवळण अंबादास गारुडकर (शिक्षण विस्ताराधिकारी), चिचोंडी पाटील व दरेवाडी वाय. बी. डेरे (शाखा अभियंता), डोंगरगण मंजुषा शिंदे (अंगणवाडी पर्यवेक्षिका), घोसपुरी व शिराढोण श्रीमती पी. एस. पवार (कनिष्ठ अभियंता), गुंडेगाव सचिन चौधरी (कृषी विस्ताराधिकारी), गुणवडी उत्तम भोसले (केंद्रप्रमुख), हमीदपूर निळू ढेरंगे (कृषी विस्तार अधिकारी), इमामपूर व पिंपळगाव माळवी संजय धामणे (केंद्रप्रमुख), इसळक व ससेवाडी श्रीमती एम. आर. कसबे (शाखा अभियंता), कर्जुनेखारे श्रीमती जयश्री उदावंत (अंगणवाडी पर्यवेक्षिका), खडकी रंजना कार्ले (अंगणवाडी पर्यवेक्षिका), खंडाळा श्रीमती निर्मला साठे (शिक्षण विस्तार अधिकारी), खांडके व शहापूर रोहिणी पालवे (अंगणवाडी पर्यवेक्षिका), कोल्हेवाडी श्रीमती सोनाली डाके (अंगणवाडी पर्यवेक्षिका), मांडवे व वाकोडी के. बी. बनकर (शाखा अभियंता), मांजरसुंबा मंजुषा शिंदे (अंगणवाडी पर्यवेक्षिका), माथनी व रतडगाव वंदना सानप (अंगणवाडी पर्यवेक्षिका), मठपिंप्री महादेव उदार (केंद्रप्रमुख), नवनागापूर दीपक मेहत्रे (एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी), निंबळक तृप्ती कोलते (गटशिक्षणाधिकारी), निमगाव घाणा जयश्री उदावंत (अंगणवाडी पर्यवेक्षिका), निमगाव वाघा व शिंगवे नाईक एस. एस. दिनकर (शाखा अभियंता), पिंपळगाव वाघा भगवान बोरुडे (केंद्रप्रमुख), पिंपरीघुमट रामदास बाबा गोसावी (केंद्रप्रमुख), पोखर्डी डॉ. विनोद काकडे (तालुका आरोग्य अधिकारी), रुईछत्तीशी रामदास दळवी (ग्राम विस्ताराधिकारी), सांडवे एस. के. दांगट (कनिष्ठ अभियंता), तांदळी वडगाव व वाळुंज मंदा माने (शिक्षण विस्तार अधिकारी), टाकळी काझी सोनाली डाके (अंगणवाडी पर्यवेक्षिका), उदरमल सुनील सारंग (कृषी अधिकारी), विळद मनीषा काळे (अंगणवाडी पर्यवेक्षिका), वारूळवाडी रेणुका नागरे (अंगणवाडी पर्यवेक्षिका), वाटेफळ श्रीमती प्रतिपा बागल (अंगणवाडी पर्यवेक्षिका).

# बौद्धिक ताकदच भारताला महासत्ता बनवेल- किरण ठाकुर

**नॅशनल बुक ट्रस्ट आफ इंडिया, गोवा सरकार, समर्थ युवा फाऊंडेशन आणि लोकमान्य कल्चरल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ते ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित गोव्यातील पहिल्या राष्ट्रीय पुस्तक महोत्सवाचे मुख्य संरक्षक म्हणून किरण ठाकुर यांनी हे शिवधनुष्य पेलले. त्यानिमित्त त्यांच्याशी केलेली ही बातचित.**





**प्रभाकर ढगे**
९३७३०२१५८४
समुह संपादक,
रयत समाचार, पणजी, गोवा

**मुलाखत**

*** राष्ट्रीय पुस्तक महोत्सव गोव्यात आयोजित करावा असे का वाटले? यामागे काही प्रेरणा- पार्श्वभूमी आहे का?**

गेली तीन वर्षे आम्ही पुण्यात पुस्तक महोत्सव आयोजित करीत आहोत. लोकमान्य कल्चरल फाऊंडेशनतर्फे या महोत्सवास आर्थिक सहकार्य केले जात आहे. सरकारच्या पुढाकाराने होणाऱ्या या पुस्तक महोत्सवास पहिल्या वेळी आम्ही एकूण चार प्रायोजकांनी प्रत्येकी २५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य केले होते. पुढील वर्षी हे सहाय्य ५० लाखापर्यंत करण्यात आले. पहिल्या वर्षी ४०० ग्रंथ दालने होती. सुमारे ४ लाख लोकांनी महोत्सवास भेट दिली. दुसऱ्या वर्षी ६०० ग्रंथ दालने थाटली व २०० प्रतिक्षेत होती. पहिल्या वर्षी १२ कोटी रुपयांची पुस्तके विकली गेली. दुसऱ्या वर्षी २५ कोटी रुपयांची पुस्तके विकली गेली. ६ ते ८ लाख लोकांनी पुस्तक महोत्सवाला भेट दिली. तिसऱ्या पुस्तक महोत्सवात ८०० ग्रंथ दालने होती. १२ लाख लोकांनी भेट दिली व ५० कोटी रुपयाहून अधिक पुस्तके विकत घेतली. या पुस्तक महोत्सवाने पुण्यातील भीमसेन जोशी व गंधर्व महोत्सवातील गर्दीचे उच्चांक मोडले. त्यातून नशनल बुक ट्रस्टचे कायमस्वरूपी ग्रंथ दालन पुण्यात उभे राहिले. तीच ग्रंथ प्रेरणा घेऊन आम्ही गोव्यात राष्ट्रीय पुस्तक महोत्सव आयोजित केला आहे.

*** गोव्यातील पहिल्या राष्ट्रीय पुस्तक महोत्सवाची तयारी कशी केली? त्यासाठी कोणाकोणाचे सहकार्य लाभले?**

गोवा ही पर्यटन पंढरी असल्यामुळे इथे येण्यास प्रत्येकजण उत्सुक असतो. गोव्यात पुस्तक महोत्सव आयोजित करण्याची कल्पना सर्वांनाच आवडली. त्यानुसार तारखा व स्थळ ठरले आणि आम्ही कामाला लागलो. सर्वांच्या सहकार्यातून हा महोत्सव साकारला.१०० पेक्षा जास्त प्रकाशकांचे २०० हून अधिक स्टॉल्स सहभागी झाले. सर्व पुस्तकांवर १०% ते २०% सूट दिल्याने गोवेकरांना दुर्मिळ पुस्तके उपलब्ध झाली. जयपूर लिटररी फेस्टिवलच्या धर्तीवरा वाचक, लेखक, कलाकार, तंत्रज्ञ या सर्वांना एकत्र आणियचे ठरले. त्यानुसार मराठी, कोकणी, हिंदी व इंग्रजी या चार भाषेतील १५० साहित्यिकांना पुस्तक महोत्सवात पाचारण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. मुख्य सभा मंडप, लेखक कट्टा, बाल दालन, चित्रकला प्रदर्शन या विविध मंचावरून वाचक, विद्यार्थी तथा अभ्यासक यांच्यासाठी विचारसत्रे हे आकर्षण ठरले.

*** मोबाईलने आमचे सर्व जगणे व्यापलेल्या आजच्या डिजिटल काळात वाचन संस्कृती टिकून राहील का? पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम त्यास पोषक ठरतील?**

वाचन संस्कृती टिकणार का हा प्रश्न सर्वांनाच पडलेला आहे. करोना साथीच्या काळात वृत्तपत्राच्या शाईतून करोना पसरतो अशी अफवा कोणी तरी पसरवली आणि लोकांचे पेपर वाचन थांबले. तेव्हापासून सुटलेली ही सवय अजून तशीच आहे. लोकांचे वृत्तपत्रांचे वाचन थांबले आहे. ते डिजिटल वाचन करू लागले आहेत. म्हणून पेपरचे खप खाली आले आहेत. वाचनाची स्थिती दारुण असलेल्या आजच्या काळात ५० वर्षांवरील लोक अजून कागदावरचा मजकूर वाचतात. नवीन पिढी डिजिटल वाचन करू लागली आहे. पण म्हणून निराश होऊन चालणार नाही. कागदावरील मजकूर वाचनाचे फायदे व डिजिटल वाचनाचे मेंदूवर होणारे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगावे लागतील. मी प्रयोग म्हणून लहान मुलांचे ग्रंथालय सुरू केले आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. लहान मुलांसाठी खास प्रकारचे थिएटर बांधले गेले पाहिजे. मी १९९६ साली जर्मनीला गेलो होतो. मुद्रण क्षेत्रातील मातब्बर लोकांना मी त्यावेळी विचारले होते. २०२० साली वृत्तपत्रांचे भवितव्य काय असेल? त्यावेळी ते म्हणाले, कागदावरची छपाई चालू आहे तोपर्यंत वृत्तपत्रे राहतील.कागदासाठी होणारी जंगल तोड थांबली तर लोक डिजिटल साधनाकडे वळतील. एआय, चट जीपीटीमुळे मेंदूचे काम कमी केले जात आहे. ते मानवी समाजाला मारक आहे. मेंदू निष्क्रिय करणारे तंत्रज्ञान परवडणारे नाही. हे कळेल तेव्हा वाचनाचे महत्त्व पुन्हा वाढेल. ग्रंथ खरेदीसाठी वाढलेला प्रतिसाद पाहता पुस्तक महोत्सवासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरतील. मोबाईलसारख्या साधनांचा अतिवापर आपले मानसिक स्वास्थ्य बिघडवत आहे. त्यावर उपाय म्हणून बेळगाव येथील हिंडलगा येथील नागरिकांनी एक प्रयोग सुरू केला आहे. सायंकाळी ७ वाजता गावात सायरन वाजतो. ७ ते ९ या दोन तासासाठी मोबाईल व संगणक पूर्णपणे बंद ठेवला जातो. मोबाईलचा अतिवापर टाळण्यासाठी असे प्रयोग उपयोगी ठरतील.

*** गोव्यात आयोजित केलेल्या पहिल्या राष्ट्रीय पुस्तक महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद कसा आहे? तुम्ही त्याबद्दल समाधानी आहात का?**

आम्ही आजपर्यंत आयोजित केलेल्या सर्व पुस्तक महोत्सवांना ठिकठिकाणी उदंड प्रतिसाद लाभला. पण गोव्यात आयोजित केलेला पहिला राष्ट्रीय पुस्तक महोत्सव गोमंतकीय जनतेला आपला वाटला नाही खंत ही आहे. गोमंतकीय जनतेने या महोत्सवाकडे बौध्दिक उंची वाढवणारा उपक्रम म्हणून पहायला हवे.गोव्यात आजकाल कसिनो, मद्यालये, रात्रीच्या पार्ट्यांना गर्दी असते. ही गोव्याची ओळख नाही. गोवा हा पूर्वे चे रोम आणि दक्षिणेची काशी म्हणून ओळखला जातो. धार्मिक सलोखा ही त्याची खरी ओळख आहे. अशा गोव्यात ग्रंथ वाचन संस्कृती वाढायला हवी. याआधी कीर्तन महोत्सव, वारकरी दिंडी ,क्रांतिकारकांचा वारसा व भजन स्पर्धा या माध्यमातून लोकमान्य व तरुण भारतने यशस्वी उपक्रम राबवले आहेत. पणजीचे प्रती पंढरपूर करून दाखवले आहे. ग्रंथ वाचनाने देशाची प्रगती होते हे वास्तव आहे. बुध्दिमत्तेच्या जोरावर भारताने परकीय चलन वेळोवेळी मिळवले आहे. म्हणून वाचनाचे महत्त्व वाढवले पाहिजे. बौद्धिक ताकदच भारताला महासत्ता बनवू शकेल. २०४७ मधील भारत कसा असेल, याचा विचार करता मजबूत व बलवान भारतासाठी आम्ही बौद्धिक उपक्रम वाढवले पाहिजे. अमेरिका जगाचा पोलिस म्हणून काम करतो. आम्हाला तशी अरेरावी करायची नाही. पण बुध्द, महावीर व गांधीजींचा वारसा सांगणारा आमचा देश जगात ताकदवान झाला पाहिजे.




# कायद्याचे बारकावे शिकवणारी अभिरूप न्यायालय स्पर्धा उत्साहात सुरू

**नगर । रयत समाचार**

अभिरूप न्यायालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायातील विविध कला, गुण व कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते. कायद्यातील विसंगती, त्रुटी तसेच बारकावे समजून घेण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात.

वकिलांनी न्यायालयासमोर उभे राहताना नेहमीच पूर्ण तयारीनिशी व खटल्याचा सखोल अभ्यास करूनच यावे, असे प्रतिपादन मा. न्यायमूर्ती किशोर सी. संत (उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद खंडपीठ) यांनी केले. येथील न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर येथे आयोजित कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील आठव्या राज्यस्तरीय अभिरूप न्यायालय स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी दीपप्रज्वलन करून कै. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव मा. ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे यांच्या नावाने ही अभिरूप न्यायालय स्पर्धा सुरू करण्यात आल्याचे सांगून त्यांच्या न्याय क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना वकिली व्यवसायातील महत्त्वाच्या टिप्स व मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सौ. निलिमा संत, प्रधान जिल्हा न्यायाधीश ए. एम. पाटील, कार्यकारिणी सदस्य ॲड. माणिक मोरे, सौ. अरुणा काळे, सौ. अलका जंगले, ॲड. सी. के. शिंदे, अमेरिका येथून आलेले विशेष निमंत्रित डॉ. बाबासाहेब सोनवणे, समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एल. मोरे, अभिरूप न्यायालयाचे न्यायाधीश ॲड. मानसी घाणेकर, ॲड. वैशाली चौधरी, ॲड. प्रीती वानखेडे, ॲड. रश्मी गौर, ॲड. प्रतिभा भराड, ॲड. परिक्रमा खोत आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत राज्यभरातील विविध विधी महाविद्यालयांचे एकूण १९ संघ सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. माधवेश्वरी म्हसे यांनी केले. त्यांनी गेल्या सात स्पर्धांचा आढावा घेत स्पर्धेचा आलेख दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. पाहुण्यांची ओळख प्रा. सुहास तोरडमल यांनी करून दिली, तर आभार डॉ. बी. डी. पांढरे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे व प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# एकनाथ शिंदे हे सामान्य जनतेचे खरे लोकनेते- अनिल शिंदे

## शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विशाल गणेश मंदिरात महाआरती

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शहर शिवसेनेच्या वतीने शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे भक्तिभावपूर्ण महाआरतीचे आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दीर्घायुष्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी व राज्याच्या प्रगतीसाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबुशेठ टायरवाले, संभाजी कदम, संजय शेंडगे, बाळासाहेब बोराटे, श्याम नळकांडे, दत्ता कावरे, सचिन शिंदे, परेश लोखंडे, विक्रम राठोड, नवनाथ कातोरे, अमित खामकर, सुरेश तिवारी, अनिल लोखंडे, संग्राम कोतकर, योगेश गलांडे, शिवाजी कदम, अभिजीत अष्टेकर, आकाश हुचे, सोनवणे आदी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



याप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले की, नामदार एकनाथ शिंदे हे केवळ शिवसेनेचे नेते नसून सामान्य जनतेच्या भावना ओळखणारे लोकनेते आहेत.

मुख्यमंत्री असोत वा उपमुख्यमंत्री, त्यांनी नेहमी नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले असून विकास, प्रशासन व लोककल्याणाच्या क्षेत्रात ठोस निर्णय घेत राज्याला नवी दिशा दिली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त ईश्वरचरणी प्रार्थना करून त्यांचे नेतृत्व राज्याला अधिक प्रगतीकडे घेऊन जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून विचारधारा आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ती अधिक बळकट झाली असून शहर विकास, पायाभूत सुविधा व सामाजिक उपक्रमांमध्ये शिवसेनेचा सक्रिय सहभाग राहिला आहे. आगामी काळात नगर शहराच्या विकासासाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. संभाजी कदम यांनी मनोगतात सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कष्टकरी, कामगार, शेतकरी व युवकांचे नेते असून त्यांचे निर्णय लोकहिताचे राहिले आहेत. बाळासाहेब बोराटे यांनी शिवसेना ही सेवा, संघर्ष व समर्पणाची चळवळ असल्याचे सांगत हा कार्यक्रम संघटनेतील एकजूट व सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असल्याचे नमूद केले.

# शनिवारी मोफत वधूवर मेळावा

## मराठा पतसंस्था व मराठा सोयरीक संस्थेचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त व शिवजयंती निमित्त मराठा पतसंस्था व मराठा सोयरीक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने १०४ वा मोफत वधूवर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा शनिवार, ता. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता जाधव लॉन, कल्याण रोड येथे होणार असल्याची माहिती मराठा सेवा संघाचे विजयकुमार ठुबे आणि मराठा सोयरीक संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे यांनी दिली. मराठा सोयरीक संस्थेने आतापर्यंत १०३ मोफत वधूवर मेळावे घेतले असून हा १०४ वा मेळावा आहे. संस्थेमार्फत आतापर्यंत ४९०० विवाह जुळवले गेले असून त्यापैकी ५६७ विवाह विधवा, विदुर व घटस्फोटीतांचे आहेत. ही संस्था धर्मादाय कार्यालयात नोंदणीकृत व शासनमान्य आहे. मराठा पतसंस्था गेली २४ वर्षे आर्थिक क्षेत्रात कार्यरत असून यावर्षी २५ वर्ष पूर्ण होत आहेत. पतसंस्थेचा एकूण व्यवहार ११० कोटींचा असून नगर शहरासह भिंगार, पाथर्डी, नेवासा, शेवगाव, संगमनेर व कर्जत येथे शाखा आहेत. पतसंस्थेचा ऑडिट

**शिक्षणमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत पुढील मेळावा ता. २२ फेब्रुवारी रोजी मालेगाव येथे होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अशोक कुटे यांनी दिली.**

**पूर्वनोंदणी केलेल्या वधू-वरांचे फोटो व बायोडाटा स्क्रीनवर प्रदर्शित केले जाणार आहेत. मेळाव्यात स्वतः उपस्थित असलेल्या मुलींना भविष्यात संस्थेमार्फत मोफत स्थळे सुचवण्याची सुविधा देण्यात येणार आहे.**

वर्ग 'अ' असून दरवर्षी समाजातील गुणवंतांचा सत्कार व मराठा समाज भूषण पुरस्कार दिला जातो. वधू-वर व पालकांनी या मोफत मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पतसंस्थेचे व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे, जाधव लॉन्सचे संचालक राजेंद्र उदागे, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे व संचालक मंडळाने केले आहे. मेळाव्यासाठी वधू-वरांनी आधारकार्ड झेरॉक्स, दोन बायोडाटा व फोटो घेऊन पालकांसह उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी ८८४७७२४६८० या क्रमांकावर संपर्क साधावा.

# सेंट्रल बँक ऑफ इंडिया विकसित भारताचे स्वप्न साकार करणार- सिन्हा

**नगर । रयत समाचार**

ग्राहकांच्या विश्वासाची बँक म्हणून ओळख असलेली सेंट्रल बँक ऑफ इंडिया विविध कर्जयोजना व क्रेडिट कॅम्पच्या माध्यमातून तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचत असून, केंद्र शासनाने पाहिलेले २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यात बँक महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे प्रतिपादन सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पुणे अंचल कार्यालयाचे मुख्य प्रबंधक मनोज सिन्हा यांनी केले.




एमआयडीसी येथील आमी संघटनेच्या सभागृहात सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने क्रेडिट आउटरीच कॅम्प व उद्यमिता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमी संघटनेचे अध्यक्ष जयरथ खकाळ, माजी अध्यक्ष राजेंद्र कटारिया, एलडीएम आशिष नवले, हरिपाल अडसूळ, मयूर जामगावकर, अजिंक्य सुरवसे तसेच बँक अधिकारी, कर्मचारी व उद्योजक उपस्थित होते. या मेळाव्यात उद्योजक, लघुउद्योजक, बांधकाम व्यावसायिक तसेच गृहकर्ज, वाहन कर्ज व व्यवसायिक योजनांअंतर्गत एकूण २१.४४ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. यावेळी मनोज सिन्हा म्हणाले की, सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या देशभरात ९० क्षेत्रांमध्ये ४४५६ शाखा असून सुमारे ८ कोटी १८ लाख ग्राहकांना सेवा दिली जाते. कमी व्याजदरात कर्जपुरवठा करून उद्योजकांना सक्षम बनवण्याचे काम बँक सातत्याने करत आहे. तळागाळातील घटकांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचवून विकसित भारताच्या दिशेने बँक वाटचाल करत आहे. आमी संघटनेचे अध्यक्ष जयरथ खकाळ यांनी सांगितले की, उद्योग वाढीसाठी बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कर्जाचा योग्य वापर करून वेळेवर परतफेड केल्यास उद्योजकांची पत वाढते.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया नेहमीच उद्योजकांच्या पाठीशी उभी राहणारी बँक आहे. प्रास्ताविकात एलडीएम आशिष नवले म्हणाले की, उद्योजक हा देशाच्या आर्थिक प्रगतीचा कणा असून बँकिंग क्षेत्रातील विविध योजना सामान्य उद्योजकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. याच उद्देशाने या व उद्यमिता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यात सेंट , सेंट हॉटेल, सेंट संजीवनी (डॉक्टर्ससाठी), सेंट शॉप, सेंट बिझनेस, सेंट व्हेईकल बिझनेस आदी योजनांतर्गत कर्जाचे वितरण करण्यात आले. यावेळी आमीचे माजी अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर जामगावकर यांनी केले, तर आभार हरिपाल अडसूळ यांनी मानले. कार्यक्रमास बँक अधिकारी, कर्मचारी, उद्योजक व लघुउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रुद्राभिषेक, भजन, महाआरतीने रंगला प्रकट दिन सोहळा

**नगर । रयत समाचार**

सद्गुरु श्री गजानन महाराज प्रकट दिन सालाबादप्रमाणे श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान, गांधी मैदान, अहिल्यानगर येथे भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. प्रकट दिनानिमित्त सकाळी श्रेणीचा रुद्राभिषेक व प्रसाद वाटपाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता श्रींचे पूजन करण्यात आले. यानंतर श्री महालक्ष्मी महिला भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम झाला. सायंकाळी ७ वाजता महाआरती, रात्री ८ वाजता महाप्रसादाचे वाटप तसेच रात्री ८.३० ते १० या वेळेत भजन संध्या आयोजित करण्यात आली. विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे प्रकट दिन उत्स्फूर्तपणे साजरा झाला. प्रकट दिनानिमित्त श्री मार्कंडेय देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी पायनापल शिरा, पिठलं, पोळी, पुलाव, ठेचा आदी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या महाप्रसादाचा सुमारे तीन हजार



भाविकांनी लाभ घेतला. तसेच मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिर परिसरातील श्री गजानन महाराज मंदिरास आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आल्याने भक्तिमय व प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसादासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व भाविकांचे देवस्थानचे उपाध्यक्ष त्रिलेश येनगंदुल यांनी आभार मानले. वर्षभरात श्री मार्कंडेय जयंती, श्री गणेश जयंती, महाशिवरात्री, श्रीराम नवमी, श्री हनुमान जयंती, श्री दत्त जयंती, धर्मनाथबीज, श्री गजानन महाराज प्रकट दिन, आषाढी एकादशी, नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन आदी धार्मिक उत्सवांचे आयोजन देवस्थानच्या वतीने केले जाते, अशी माहिती ज्ञानेश्वर मंगलारम यांनी दिली. प्रकट दिन उत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे पदाधिकारी, श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुपचे सदस्य तसेच कुमार आडेप, वाय. प्रकाश टेलर, रघुनाथ गाजेंगी, दत्तात्रय जोग, रमाकांत बिज्जा, गणेश आकेन, विनायक बत्तीन, शिवाजी संदुपटला, सागर सब्बन, शंकर नक्का, अंबादास चाटला, अंबादास रच्चा, अजय गुरुड, रमेश कोंडा, श्रीनिवास वंगारी, हनुमान म्याकल, शंकर मुत्याल, व्यंकटेश नक्का, प्रमोद अंकम, शुभम सुंकी, श्रीनिवास एलाराम, श्रीनिवास बुरगुल, विजय मच्चा, बालकिसन आकूल, दिलीप गटने, श्रीनिवास श्रीगादी, शेखर दिकोंडा, नितीन कामुनी आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

रयत समाचार Classified
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीला मोठा प्रतिसाद

## ‘कृषीपर्व’ महोत्सवात ३.४२ कोटींची उलाढाल

**अहमदनगर । रयत समाचार**

शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीच्या संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत नगरपुणे रोडवरील नेमाणे इस्टेट येथे ता. ५ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित ‘कृषीपर्व’ कृषी महोत्सवाचा समारोप जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या उपस्थितीत झाला. महोत्सवात ३ कोटी ४२ लाख रुपयांची उलाढाल झाल्याने शेतकरी व ग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. अहिल्यानगर कृषी विभाग, आत्मा, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद आणि एक्सपो इंडिया ओशियन प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले होते. शेतकरी व ग्राहकांमध्ये थेट व्यवहार झाल्याने दर्जेदार माल ग्राहकांना उपलब्ध झाला, तर शेतकऱ्यांना योग्य दर मिळाला.



समारोप प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी स्टॉलधारकांशी संवाद साधून प्रमाणपत्रांचे वितरण केले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी सांगितले की, महोत्सवाला ४ लाखांहून अधिक नागरिकांनी भेट दिली. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्रातील नवकल्पनांची माहिती घेतली. शेतकरीग्राहक विश्वासाची नवी साखळी निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांना पुढेही प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प संचालक आत्मा प्रदीप लाटे, प्रकल्प उपसंचालक राजाराम गायकवाड, कृषी उपसंचालक सागर गायकवाड, उपकृषी अधिकारी दत्तात्रय डमाळे तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**अशा महोत्सवांमुळे शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळत असल्याचे स्टॉलधारकांनी सांगितले. भविष्यात वर्षातून किमान दोनदा असे महोत्सव आयोजित करावेत, अशी नागरिकांची मागणी यावेळी करण्यात आली.**



## गैरमार्ग टाळा, यश मिळवा– प्रा. वाकचौरे

### जवाहर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

नेवासा तालुक्यातील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा येथे राजर्षी शाहू महाराज सभागृहात आयोजित कार्यक्रमात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. प्राचार्य अंशुमन वाकचौरे यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. शिवाजी रामराव सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब न करता कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा देऊन उज्ज्वल यश संपादन करावे, असे प्रतिपादन प्राचार्य अंशुमन वाकचौरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना केले. जवाहर विद्यालयातून संस्कारशील व आदर्श पिढी घडविण्याचे कार्य शिक्षकवृंद करत असून त्यांच्या मार्गदर्शनाचा उपयोग विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी करावा, असे डॉ. शिवाजी रामराव सावंत यांनी सांगितले. यावेळी मार्गदर्शक शिक्षक कार्ले पी.एम., शेंडगे एस.आर., राजगुरू व्ही.व्ही., वैरागर ए.के. तसेच उपप्राचार्य रघुनाथ भोजने यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. आरती कुऱ्हाडे, शालिनी बोधक, वैष्णवी जावळे, ऋतुजा तांबे यांनी शाळा व शिक्षकांविषयी भावना व्यक्त केल्या. व्यासपीठावर प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. रावसाहेब राशिनकर, ज्येष्ठ शिक्षक जे.एस. शेटे, एन.के. म्हसे, बी.एस. घोडे, एस.एस. कासार उपस्थित होते. प्रास्ताविक व अध्यक्षीय निवड कांचन थोरात व श्वेता शिंदे यांनी केली. सूत्रसंचालन साजिया शेख व हर्षदा संदीप थिटे यांनी केले, तर आभार राधिका जावळे हिने मानले.

## नो पार्किंग झोन गायब, बेकायदा वाहनतळांचा सुळसुळाट

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शहरात नो पार्किंग झोन प्रभावीपणे अस्तित्वात नसल्यामुळे अनेक ठिकाणी बेकायदा वाहनतळ उभे राहत असून चौकांची स्थिती विस्कळीत दिसू लागली आहे.

ठिकठिकाणी अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी व नागरिकांची गैरसोय वाढत आहे. शहरातील बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मौलाना आझाद चौक, दशमेश नगर चौक, बेलापूर भगतसिंह चौक आदी ठिकाणी रिक्षा तसेच मोठ्या वाहनांचे अनधिकृत पार्किंग दिसून येते. पालिकेच्या नोंदीनुसार वाहनतळांची संख्या मर्यादित असली तरी प्रत्यक्षात शहर वाहनांनी गजबजलेले आहे.

**सध्या शहरात दुचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून विनापरवाना वाहन चालवणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. इलेक्ट्रिक वाहने चालवण्यासाठी परवाना आवश्यक नसल्यामुळे लहान मुलेही ही वाहने चालवत असल्याचे दिसून येत असून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा आहे.**

**सन १९९७–९८ दरम्यान तत्कालीन जिल्हाधिकारी मेधा गाडगीळ यांनी शहरात नो पार्किंग झोन निश्चित केले होते; मात्र कालांतराने हे झोन दिसेनासे झाले आहेत.**

अनधिकृत वाहनतळांमुळे व्यापारी व दुकानदारांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुकानांसमोर दुचाकी व तीनचाकींची गर्दी असल्याने ग्राहकांना वाहन लावण्यासाठी जागा मिळत नसल्याची स्थिती आहे. बाहेरून येणाऱ्या नागरिकांना पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे शहरात येणे टाळावे लागत असल्याचे चित्र असून याचा व्यापारावरही परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे नगरपालिकेने आराखडा तयार करून नो पार्किंग झोन पुन्हा कार्यान्वित करत चौकांची शिस्तबद्ध व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ‘न्यू आर्टस’चे निवृत्त प्राचार्य डॉ. विद्याधर औटी यांचे निधन

**अहमदनगर । रयत समाचार**

येथील न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. विद्याधर भास्करराव औटी यांचे सोमवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शिक्षण, सामाजिक चळवळ आणि प्रगतिशील विचारधारेच्या क्षेत्रात मोठी हानी झाली आहे. डॉ. औटी यांनी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत पारनेर व नगर येथे प्राचार्य म्हणून जबाबदारी पार पाडली होती. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले. ते पारनेरचे माजी आमदार विजय औटी यांचे मोठे बंधू होत. त्यांनी वडीलांचा कम्युनिस्ट विचारांचा निष्ठेने वारसा जपला. पारनेर तालुक्यात सामाजिक सलोखा टिकून राहावा, यासाठी त्यांनी कायम पुढाकार घेतला. सामाजिक समतेसाठी व परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. सावित्री– फातिमा विचार मंचाच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका : समाजातील अंधश्रद्धा, प्रतिगामी विचार आणि जातीय– धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीविरोधात त्यांनी ठाम भूमिका घेतली. ‘सावित्री– फातिमा विचार मंच’च्या स्थापनेत त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. आदर्श शिक्षक आणि लढाऊ कार्यकर्ता : डॉ. औटी हे केवळ प्रशासक नव्हते, तर एक आदर्श शिक्षक, संवेदनशील समाजकार्यकर्ता आणि लढाऊ कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधन घडवणे, विवेकवाद रुजवणे आणि समाजात समतेची मूल्ये टिकवणे हे त्यांचे ध्येय होते. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रासह सामाजिक चळवळीतील एक प्रखर आवाज शांत झाला आहे.



## आश्वासनानंतर संभाजी ब्रिगेडचे दशक्रिया आंदोलन मागे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांबाबत संभाजी ब्रिगेडतर्फे करण्यात येणारे प्रतीकात्मक दशक्रिया आंदोलन प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. संबंधित कामांबाबत ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन तहसील प्रशासनाकडून देण्यात आले. एमएसआयडीसी (MSIDC) या एजन्सीमार्फत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला होता. वारंवार निवेदने देऊनही दखल घेतली जात नसल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. सोमवार, ता. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू असताना तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून कामाची गुणवत्ता सुधारण्यात येईल, दोषी ठेकेदारावर कारवाई केली जाईल तसेच तात्काळ काम सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्यास भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. लेखी आश्वासनानंतर शांततेच्या मार्गाने आंदोलन मागे घेण्यात आले.



# देवगडकरांनी जपली ८०० वर्षांची परंपरा

## मानाच्या होलम काठीचे उत्साहात स्वागत

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

‘सदानंदाचा येळकोट’, ‘भैरवनाथांचं चांगभल’ अशा जयघोषात संगमनेर येथून जेजुरीकडे जाणाऱ्या मानाच्या होलम काठीचे आगमन देवगड, हिवरगाव पावसा येथे झाले. ग्रामस्थांच्या वतीने होलम काठीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. जेजुरी येथे माघ पौर्णिमेस होणाऱ्या यात्रेनिमित्त मानाच्या शिखर काठ्यांच्या मिरवणुकीत संगमनेरची होलम काठी सुमारे ८०० वर्षांपासून सहभागी होत आहे. माघ पौर्णिमा यात्रेनंतर या मानाच्या होलम काठीचे येथे आगमन झाले. यावेळी भंडाऱ्याची उधळण करत ग्रामस्थांनी स्वागत केले. काठी व पालखीची आरती करण्यात आली. त्यानंतर श्रीक्षेत्र देवगड खंडोबा देवस्थान ट्रस्ट व भाजीपाला व्यापारी सोमनाथ शिवाजी गुंजाळ यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. तसेच सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक नारायण पावसे यांच्या वस्तीवर होलम काठीचे स्वागत करून भाविकांना चहा व अल्पोहार देण्यात आला. यावेळी मनाची होलम काठी व पालखीची पारंपरिक वाद्यांसह मिरवणूक काढण्यात आली. मल्हारी मार्तंड होलम भक्त सार्वजनिक मंडळाचे प्रमुख भाऊसाहेब सातपुते, तुकाराम काठे यांच्यासह सहभागी भक्तांचा श्रीक्षेत्र खंडोबा देवगड देवस्थान ट्रस्टतर्फे सत्कार करण्यात आला. दोन दिवसांच्या यात्रा उत्सवासाठी दर्शन व्यवस्था, स्टॉलधारकांचे नियोजन, गर्दी नियंत्रण, पार्किंग व वाहतूक व्यवस्था यांचे उत्कृष्ट नियोजन तालुका प्रशासन, पोलीस प्रशासन, देवस्थान ट्रस्ट, यात्रा उत्सव समिती व ग्रामस्थांनी केल्याने भाविकांचा आनंद द्विगुणित झाला. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाबासाहेब पावसे, सचिव अनिल गडाख, उपाध्यक्ष संतोष पावसे, खजिनदार अण्णासाहेब शिंदे, विश्वस्त सोमनाथ पावसे, गणेश गडाख, मधुकर शिंदे, विकास पावसे, अमिरत येरमल, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक नारायण पावसे, सोसायटी संचालक अशोक भालेराव, वृक्षमित्र गणपत पावसे, संपादक यादवराव पावसे, गायक हरिचंद्र भालेराव यांच्यासह मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित होते.





## शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी आढाव, गेरंगे कार्याध्यक्ष

### डिजेला फाटा देत उभारणार स्वागत कमान

**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील इसळक येथे सालाबादप्रमाणे शिवजयंती साजरी करण्यात येणार असून त्यासाठी उत्सव समिती गठित करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी नवनाथ आढाव तर कार्याध्यक्षपदी बांधकाम व्यावसायिक प्रमोद गेरंगे यांची एकमताने निवड करण्यात आली. खजिनदार व समन्वयक म्हणून विकास चव्हाण यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. खंडोबा मंदिराच्या आवारात नुकत्याच झालेल्या बैठकीत गावातील युवक व तरुणांनी एकत्र येऊन समितीची निवड केली. यावेळी प्रगतशील दूध उत्पादक संदीप गेरंगे, युवा सामाजिक कार्यकर्ते किरण खामकर, माजी सरपंच बाबासाहेब गेरंगे, इंजि. रोहित चव्हाण, संदीप खर्से, अमोल चोथे, नितीन खंडागळे आदी उपस्थित होते. बैठकीत शिवजयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत चर्चा झाली. किरण चव्हाण यांनी डीजे मिरवणुकीला फाटा देत गावाच्या दर्शनी भागात स्वागत कमान उभारण्याचा ठराव मांडला. चर्चेनंतर यावर एकमत झाले असून शिवप्रतिमा पूजनानंतर ज्येष्ठ ग्रामस्थांच्या हस्ते भूमिपूजन करून स्वागत कमानीच्या कामास प्रारंभ करण्यात येणार असल्याची माहिती महादेव गवळी यांनी दिली.

**स्वयंस्फूर्तीने सहभागी होणाऱ्या सर्वांसाठी उत्सव समिती खुली असून अधिकाधिक तरुणांनी सहभागी व्हावे, तसेच महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यासाठी समिती प्रयत्नशील राहील.**

**नवनाथ आढाव,**
अध्यक्ष,
शिवजयंती उत्सव समिती

## हायमास्ट निधी गैरवापराची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे करणार– मणियार

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**



पाथर्डी नगरपरिषदेला विधानपरिषद आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या प्रयत्नातून हायमास्ट व स्ट्रीटलाईटसाठी मिळालेल्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप माजी नगरसेवक चांद मणियार यांनी केला आहे. या प्रकरणात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा दावा करत लवकरच जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे तक्रार दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.आ. गर्जे यांच्या प्रयत्नांतून शहरातील आदर्श नगर, नवीन बसस्थानक ते स्वामी समर्थ मंदिर मार्गावरील स्ट्रीटलाईटसह विविध कामांना मंजुरी देण्यात आली होती. यापैकी काही कामे पूर्ण झाली असली तरी ती निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप मणियार यांनी केला. तसेच काही कामे प्रत्यक्षात न करता पूर्ण झाल्याचे दाखवून त्यांची बिले काढण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या कामांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तांत्रिक तपासणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, संगणक अभियंता असलेल्या अरुण तोगे यांना कोणताही विद्युत विभागाचा अनुभव नसताना त्यांच्याकडे वीज विभागाचा पदभार कसा आणि कोणी दिला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. नगरपरिषद प्रशासनातील कथित अनियमितता व भ्रष्टाचार उघड करण्यासाठी आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांकडे औपचारिक तक्रार करणार असल्याचे मणियार यांनी स्पष्ट केले.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,
दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय
इमारत,आकाशवाणीसमोर, सावेडी,
अहिल्यानगर –४१४००३
जावक क्रमांक/३६२/२०२६
दि. ३०/०१/२०२६

### चौकशीची जाहीर नोटीस

**चौकशी अर्ज क्रमांक – १४/२०२६**
**न्यासाचे नाव – बालगोपाल फाऊंडेशन**
**न्यासाचा पत्ता** – ईशास्तुती, ११५, रिध्दी सिध्दी, गुलमोहोर रोड, सावेडी, अहिल्यानगर
**अर्जदार– डॉ. सुरेश रामदास पठारे**
**सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,**

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दीष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**अ) जंगम मिळकत – रोख रक्कम १०,०००/– (रुपये दहा हजार मात्र) अध्यक्षांकडे जमा.**

**ब) स्थावन मिळकत – (वर्णन) – काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल, त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल,व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

**ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दि. २९/०१/२०२६ रोजी दिली.**

कोर्टाचा शिक्का

| न्यायलिपीक | अधिक्षक |
| --- | --- |
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर |

# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

# कामिंदू मेंडिसची वादळी खेळी



## श्रीलंकेचा आयर्लंडवर २० धावांनी दमदार विजय

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

आयसीसी पुरुष टी विश्वचषक २०२६ मधील सहाव्या सामन्यात गट ब मध्ये श्रीलंकेने आयर्लंडवर २० धावांनी शानदार विजय मिळवला. कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात श्रीलंकेने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर प्रभावी कामगिरी केली.

कामिंदू मेंडिसची आक्रमक खेळी आणि गोलंदाजांचा शिस्तबद्ध मारा या विजयाचे प्रमुख आधार ठरले. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेची सुरुवात सावध झाली. पाथुम निसांका याने २३ चेंडूंमध्ये २४ धावा केल्या. कामिल मिशाराने ११ चेंडूंमध्ये १४ धावांचे योगदान दिले. कुसल मेंडिसने संयमी खेळ करत ४३ चेंडूंमध्ये नाबाद ५६ धावा केल्या. मधल्या फळीत पावन रत्नायके आणि दुनिथ वेल्लालागे स्वस्तात बाद झाले. त्यानंतर कामिंदू मेंडिसने मैदानात धडाकेबाज फलंदाजी करत अवघ्या १९ चेंडूंमध्ये ४४ धावा झळकावल्या. या खेळीत ४ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. शेवटी श्रीलंकेने २० षटकांत ६ बाद १६३ धावांची मजबूत धावसंख्या उभारली. १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंडची सुरुवात अडखळती झाली. कर्णधार पॉल स्टर्लिंग १३ चेंडूंमध्ये ६ धावा करून बाद झाला. रॉस अडायरने २३ चेंडूंमध्ये ३४ धावा केल्या. हॅरी टेक्टरने ३४ चेंडूंमध्ये ४० धावांची झुंज दिली. लॉर्कन टकरने २१ धावा केल्या. मात्र नियमित अंतराने पडणाऱ्या विकेट्समुळे आयर्लंडला गती मिळाली नाही. अखेर आयर्लंडचा संघ १९.५ षटकांत सर्वबाद १४३ धावांपर्यंतच मजल मारू शकला. श्रीलंकेकडून महिश तिक्षणाने अचूक गोलंदाजी करत ४ षटकांत २३ धावा देत ३ बळी घेतले. वानिंदू हसरंगानेही ३ बळी मिळवत दबाव कायम ठेवला. मथीशा पथिरानाने २, तर दुनिथ वेल्लालागे आणि दुष्मंथा चमेरा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. या सामन्यातील अष्टपैलू आणि निर्णायक कामगिरीसाठी कामिंदू मेंडिसला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. या विजयासह श्रीलंकेने गटातील आपली स्थिती भक्कम केली. कोलंबोतील प्रेक्षकांनी या रंगतदार सामन्याचा मनमुराद आनंद घेतला.

# उर्दू शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात शिक्षकांची महत्त्वाची भूमिका– सय्यद

**नगर । अबीद खान**

उर्दू भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती समृद्ध संस्कृती, इतिहास आणि साहित्य जपणारी अमूल्य देणगी आहे. उर्दू शाळांमधील शिक्षक प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करत असून त्यांच्या मेहनतीमुळे उर्दू शिक्षणाचा दर्जा उंचावत आहे. नव्या पिढीने उर्दू भाषा आत्मसात करून ज्ञान, संस्कार आणि समाजसेवेची वाट निवडावी. उर्दू शाळांचा विकास म्हणजे समाजाचा विकास असून या कार्यात सर्वांनी एकत्र येऊन योगदान देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन एन.एम. फाउंडेशनचे जाहीद सय्यद यांनी केले. एन.एम. फाउंडेशनचे जाहीद सय्यद यांनी १८८८ साली स्थापन झालेल्या दर्गा दायरा येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी



शाळेचे मुख्याध्यापक फैय्याज शेख यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.

या प्रसंगी शेख ताहेरा शिरीन मोहम्मद हुसेन, शेख नसीम मोहम्मद इब्राहिम, शेख शाकेरा अजीज, शिरीन खान आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. भेटीदरम्यान जाहीद सय्यद यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम तसेच शिक्षकांच्या मेहनतीचे कौतुक केले. शिक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे उर्दू शाळांचा शैक्षणिक स्तर उंचावत असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# श्रीरामपूर केमिस्ट असोसिएशन अध्यक्षपदी आनंद कोठारी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर तालुका केमिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी आनंद पोपटलाल कोठारी, सचिवपदी कोविल बाजीराव खेमनर व खजिनदारपदी रवींद्र तुकाराम चौधरी यांची वार्षिक सभेत सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. तालुका केमिस्ट असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा ता. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी साई रौनक मंगल कार्यालय येथे पार पडली. मावळते अध्यक्ष सुजित राऊत यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.

यावेळी अन्न व औषध प्रशासन, अहिल्यानगरचे सहआयुक्त सोमनाथ मूळे यांनी मार्गदर्शन केले. उपाध्यक्षपदी माधव आसने व प्रशांत कोठारी, सहसचिवपदी प्रशांत उचित आणि सहखजिनदारपदी संदीप टूपके यांची निवड करण्यात आली. या प्रसंगी अहिल्यानगर महाराष्ट्र सेंट्रल





झोनचे उपाध्यक्ष शशांक रासकर, कै. ओमप्रकाश गुलाटी ट्रस्टचे अध्यक्ष रवींद्र गुलाटी, अहमदनगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब ढेरंगे आदी उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक शशांक रासकर यांनी करून उपस्थितांचे स्वागत केले. सभेसाठी ओम नारंग, कैलास चायल, उदय बधे, जलिंदर भवार, प्रदीप डावखर, अश्पाक शेख, रियाज पोपटीया, दिपक उघडे, शशिकांत गौड आदींनी सहकार्य केले व चर्चेत सहभाग घेतला. सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले तर आभार कोविल खेमनर यांनी मानले.

# विरोधी पक्षनेतेपदी बाळासाहेब बोराटेंची नियुक्ती करा

## शिवसेना गटनेते दत्तात्रय कावरे यांची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना पक्षाचे दहा नगरसेवक निवडून आले असून पक्षाच्या नगरसेवकांच्या बैठकीत दत्तात्रय कावरे यांची गटनेते म्हणून सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेनेचे नगरसेवक बाळासाहेब मारुती बोराटे यांची महानगरपालिकेत विरोधी पक्षनेते (Leader of Opposition) म्हणून नियुक्ती करण्यात यावी, अशी शिफारस करत गटनेते दत्तात्रय कावरे यांनी महापौर जोती गाडे यांना पत्र दिले. संबंधित नियुक्तीस लवकरात



लवकर मान्यता द्यावी, अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आली आहे.

# सातवी ते एमए उषा शिंदे यांच्या थांबलेल्या शिक्षणाचा प्रेरणादायी प्रवास

## न्यू आर्ट्स कॉलेज येथे विशेष सन्मान

**शेवगाव । रयत समाचार**

शिक्षणातील अडचणी, सामाजिक बंधने व कौटुंबिक जबाबदाऱ्यांवर मात करत उषा अशोक शिंदे-जगधने यांनी बी.ए. व एम.ए. (इतिहास) मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, शेवगाव येथे विशेष सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यास आबासाहेब काकडे विद्यालयातील अशोक तनमर, गायकवाड, पुजारी तसेच न्यू आर्ट्स कॉलेजचे प्रा. डॉ. मिरे, प्रा. नवथर, प्रा. डॉ. शेळके, प्रा. वैद्य, प्रा. शेंडगे, प्रा. कसबे आदी उपस्थित होते. मान्यवरांनी उषा शिंदे यांच्या शैक्षणिक वाटचालीचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे त्यांनी केवळ स्वतःचे स्वप्न पूर्ण केले नसून महिलांसाठी शिक्षणाचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. पुढील



काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक विचारांवर संशोधन करण्याचा तसेच कायद्याचे शिक्षण घेण्याचा त्यांचा मानस असून बालविवाह प्रतिबंधासाठी समाजजागृतीचे कार्यही सुरू केले आहे. या प्रवासात पती अशोक शिंदे यांचे मार्गदर्शन व पाठबळ लाभल्याचे त्यांनी नमूद केले.

# नालासोपाऱ्यात भव्य टर्फ अंडर आर्म लीग क्रिकेट स्पर्धा जल्लोषात

**नालासोपारा । गुरुदत्त वाकदेकर**

जय हनुमान क्रिकेट संघ, बामणघर यांच्या वतीने आयोजित पर्व२ भव्य टर्फ अंडर आर्म लीग क्रिकेट स्पर्धा २०२६ रविवार, दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी नालासोपारा येथील अब्राहम टर्फ चक्रेश्वर तलाव मैदान, कोकाकोला डिस्ट्रिब्युटर समोर, नालासोपारा वेस्ट येथे उत्साहात पार पडली. अविनाश जाधव यांच्या हस्ते क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. स्पर्धेचे विजेतेपद दोस्ती११ पाट संघाने (प्रथम क्रमांक) पटकावत १५,००० रुपये रोख आणि आकर्षक चषक जिंकला. हे पारितोषिक दिपक बावकर, दिनेश बागवे आणि संजय जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कालिका क्रीडा मंडळ जांभुळनगर पालवणी संघाने द्वितीय क्रमांक मिळवत १०,००० रुपये रोख आणि चषक पटकावला. हे पारितोषिक दिपक बावकर, शिवाजी कदम आणि सचिन चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले. माऊली प्रतिष्ठान संघाने तृतीय क्रमांक मिळवत ३,००० रुपये रोख आणि चषक पटकावला. हे पारितोषिक



निलेश पालांडे आणि काशिनाथ चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले. स्मरण११ बामणघर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवत २,००० रुपये रोख आणि चषक पटकावला. हे पारितोषिक विनेश साळवी आणि योगेश जाधव यांच्या हस्ते देण्यात आले. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये उत्कृष्ट गोलंदाज म्हणून भरत (कालिका क्रीडा मंडळ पालवणी) यांना कृष्णा चव्हाण आणि नंदकुमार जाधव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तर उत्कृष्ट फलंदाज म्हणून रितिक (दोस्ती११ पाट) यांना शुभम आणि आशिष यांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेत शिवम११ पेवकोंड, पालवणी स्ट्रायकर्स, स्मरण११ बामणघर, दोस्ती११ चिपळूण, अमरज्योत११ देव्हारे, महाकाली संघ पालवणी, श्री भैरी भवानी क्रीडा संघ सावेळी, दोस्ती११ पाट, माऊली प्रतिष्ठान, स्वरा११ खारेपाटण, गणेश११ संगमेश्वर, भैरी भवानी क्रिकेट संघ तळेघर, संदीप९, कालिका क्रीडा मंडळ पालवणी, गुहागर बॉईज आणि भैरी क्रिकेट संघ आतखोल आदी संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेत विविध गटांतील २८ सामने खेळविण्यात आले. सामन्यांदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना उत्स्फूर्त दाद दिली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी काशिनाथ चव्हाण, निलेश पालांडे, योगेश जाधव, शुभम चव्हाण, कृष्णा चव्हाण, आशिष जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. विनेश साळवी, सचिन चव्हाण, राहुल साळवी, नंदकुमार जाधव, मनिष जाधव, विनोद साळवी, राहुल म्हामुणकर, दगडू म्हामुणकर, संजय जाधव, रोहन कदम, यश चव्हाण, यांच्यासह स्मरण चव्हाण, वेद साळवी आणि अद्विक जाधव यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. अनेक देणगीदारांनी आर्थिक व वस्तुरूपात मोलाचे सहकार्य केले. सर्व देणगीदारांचे आणि सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. स्पर्धेचे समालोचन गुरुदत्त वाकदेकर यांनी केले. या भव्य क्रिकेट स्पर्धेमुळे क्रीडाप्रेमींमध्ये उत्साह संचारला असून, युवकांना खेळासाठी प्रेरणा मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

